वर्ष : ०५ अंक: १६ मुंबई, मंगळवार १२ मार्च २०१९ ते १८ मार्च २०१९ पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 महापौर निधी जातो कुठे?

3 → नाणार जाणार, कोकणात काय येणार?

तालिबानच्या मदतीनं मसूदचा भारतात हल्ले करण्याचा प्लॅन ← 4

# २०१९ लोकसभा निवडणुकीचं बिगुल वाजलं!





## देशात ७ टप्प्यात होणार निवडणुका, मतमोजणी २३ मे ला

*नवी दिल्ली - निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीची घोषणा केली आहे. आयोगाने लोकसभेच्या एकूण ५४३ जागांवर ७ टप्प्यात निवडणुकीची घोषणा केली आहे. ११, १८, २३, २९ एप्रिल आणि ६, १२ आणि १९ मे रोजी निवडणुका होणार आहेत. सर्व टप्प्यातील मतमोजणी ही २३ मे रोजी होईल. २२ राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांत एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त सुनील अरोरा यांनी याची घोषणा केली. देशात आजपासून आचारसंहिता लागू झाल्याचेही त्यांनी सांगितले. मागील वेळी देशात ९ टप्प्यात मतदान झाले होते. विद्यमान लोकसभेचा कार्यकाळ ३ जूनला संपणार आहे.*

पहिल्या टप्प्यात २० राज्यांमधील ९१ जागांवर मतदान होईल. दुसऱ्या टप्प्यात १३ राज्यातील ९७ जागांसाठी मतदान होईल. तिसऱ्या टप्प्यात १४ राज्यातील ११५ जागांसाठी मतदान होईल. चौथ्या टप्प्यात ९ राज्यातील ७ जागा, ५ व्या टप्प्यात ७ राज्यातील ५१ जागा, सहाव्या टप्प्यात ७ राज्यातील ५९ जागा आणि ७ व्या आणि अखेरच्या टप्प्यात ८ राज्यातील ५९ जागांसाठी मतदान होईल. दिल्लीत सहाव्या टप्प्यात म्हणजे १२ मे रोजी मतदान होईल. १२ राज्यातील ३४ विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठीही लोकसभेबरोबर मतदान होईल.

### प्रत्येक मशीनमध्ये व्हीव्हीपॅटची सुविधा



यंदा सर्व मतदानकेंद्रावर व्हीव्हीपॅट मशीनची सुविधा असेल. त्यामुळे मतदाराला त्याने केलेले मत कोणाला गेले आहे ते समजेल. त्याचबरोबर ईव्हीएमलाही अनेक स्तरीय सुरक्षा असेल. प्रत्येक उमेदवाराला फॉर्म २६ भरावे लागेल. देशभरात एकूण १० लाख मतदान केंद्रांवर मतदान होईल. २०१४ मध्ये ही संख्या ९ लाखांच्या आसपास होती. सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे असतील. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे चित्रिकरण केले जाणार आहे.

### कोणत्या टप्प्यात कोठे होणार मतदान



**पहिला टप्पा - २० राज्यात ९१ लोकसभा जागांसाठी मतदान**

आंध्र प्रदेश २५, अरुणाचल २, आसाम ५, बिहार ४, छत्तीसगढ़ १, जम्मू-कश्मीर २, महाराष्ट्र ७, मणिपुर १, मेघालय १, मिजोरम १, नागालँड १, ओडिशा ४, सिक्किम १, तेलंगाना १७, त्रिपुरा १, उत्तर प्रदेश ८, उत्तराखंड ५, पश्चिम बंगाल २, अंदमान-निकोबार १, लक्षद्वीप १

**दुसरा टप्पा - १३ राज्यात ९७ लोकसभा जागांसाठी मतदान**

आसाम ५, बिहार ५, छत्तीसगढ़ ३, जम्मू-कश्मीर २, कर्नाटक १४, महाराष्ट्र १०, मणिपुर १, ओडिशा ५, तमिळनाडू ३९, त्रिपुरा १, उत्तर प्रदेश ८, पश्चिम बंगाल ३ , पद्दुचेरी १

**तिसरा टप्पा - १४ राज्यात ११५ लोकसभा जागांसाठी मतदान**

आसाम ४, बिहार ५, छत्तीसगढ़ ७ सीटें, गुजरात २६, गोवा २,

उर्वरित पृष्ठ 2 वर




## उद्योगश्री जीवनगौरव पुरस्काराने रोहिदास पाटील सन्मानित



**भाईदर (प्रतिनिधी) –** प्रविण रब्बर कंपनीचे संचालक व श्री शंकर नारायण एज्युकेशन ट्रस्ट संस्थेचे अध्यक्ष तथा मिरा भाईंदर मनपा सभागृह नेता रोहिदास पाटील यांना उद्योगश्री प्रकाशनाद्वारा सन २०१८ सालाचा उद्योगश्री जीवनगौरव पुरस्कार मुंबई मराठी पत्रकार संघ येथे उद्योगाद् राष्ट्र वैभवम् २५ वर्षे सन्मानाची, उद्योगश्री प्रकाशनाची ३६ वर्षे या कार्यक्रमात प्रदान करून गौरविण्यात आले आहे.

यावेळी उद्योगश्री प्रकाशनाचे संपादक भीमाशंकर कठारे म्हणाले की, आमच्या मजकुरातून मराठी माणसाला उद्योग समजावून त्याची जडण घडण व्हावी, मराठी उद्योजक तयार व्हावे, मी उद्योजक होणार असे म्हणणारी तरुणपिढी तयार व्हावी. याच उद्देशाने आम्ही उद्योगश्री हा पुरस्कार प्रदान करत असतो. उद्योजकच भारताला महासत्ता देश बनवू शकतात. तसेच टीम असेल तरच उद्योजक मोठा होऊ शकतो असे या कार्यक्रमात सर्वांनी अधोरेखित केले.

उर्वरित पृष्ठ 4 वर

## मिरा-भाईंदर शहर फेरीवाला समिती बरखास्त?

### ६ महिने होऊन एकही बैठक नाही, समितीचे कामकाज बासनात बांधून ठेवल्याचा संशय



**मुंबई- महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या आदेशानुसार मिरा-भाईंदर महापालिकेने गठीत केलेली शहर फेरीवाला समितीचे कामकाज महापालिकेने बासनात बांधून ठेवल्यामुळे समिती बरखास्त केली गेली असल्याचा संशय समिती सदस्य व्यक्त करत आहेत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ लागू करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाने पारित केलेल्या निर्णयाच्या आदेशानुसार महापालिकेने शहर फेरीवाला समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला होता. त्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रासाठी चार प्रवर्गातील ३० सदस्यांची फेरीवाला समिती २३ सप्टेंबर २०१५ रोजी गठीत करण्यात आली होती. त्यावेळी समितीची एकच बैठक झाली, त्यात सभासदांचा परिचय करून देण्यात आला होता. नंतर काही दिवसातच

उर्वरित पृष्ठ 2 वर

### असे होते शहर फेरीवाला समितीच्या कामाचे स्वरूप

महापालिका क्षेत्रातील पथ विक्रेते शोधून काढण्यासाठी त्यांचे सर्वेक्षण करून त्यांची जागा निश्चित करून देणे. पात्र पथ विक्रेत्यांना प्रमाणपत्र देणे, त्यांच्याकडून अटी शर्तीचे उल्लंघन झाले असल्याचे आढळून आल्यास त्यांचे प्रमाणपत्र रद्द करणे, शहरात ना फेरीवाला क्षेत्र निश्चित करून त्याची प्रशासनाकडे शिफारस करणे, पथ विक्रेत्यांसाठी कर्ज, विमा तसेच इतर कल्याणकारी योजनांसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणे. महापालिका प्रशासन किंवा तक्रार निवारण समितीकडे प्रलंबित असलेले विवाद प्रकरणांचा पाठपुरावा करणे असे होते शहर फेरीवाला समिती कामाचे स्वरूप होते.

## मुंबईत पाच वर्षांत बलात्काराचे गुन्हे दुपटीने वाढले

**मुंबई- स्वप्ननगरी समजल्या जाणाऱ्या मुंबईत महिला असुरक्षित असल्याचं पुन्हा एकदा सिद्ध झालंय. मुंबईत गेल्या पाच वर्षांत बलात्कार आणि विनयभंगाचे गुन्हे दुपटीने वाढल्याची धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. प्रजा फाउंडेशनच्या अहवालात हे वास्तव समोर आलं आहे.**

२०१३-१४ ते २०१७-१८ या पाच वर्षांत शहरात बलात्काराच्या घटना ८३ टक्क्यांनी, तर विनयभंगाच्या घटना ९५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. मुंबईतील गेल्या पाच वर्षांतील गुन्हेगारीचा लेखाजोखा प्रजा फाउंडेशननं सादर केला आहे. दक्षिण मुंबई म्हणजेच वरळी, भायखळा, कुलाबा, मलबार हिल या परिसरात बलात्काराच्या गुन्ह्यांत १७२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तर उत्तर मुंबईत विनयभंगाच्या घटनांमध्ये १८६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तर दंगलीच्या घटनांमध्ये ३६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अल्पवयीन मुलं, तरुणांविरोधातील लैंगिक अत्याचारांमध्येही (पॉस्को अन्वये) १८ टक्क्यांनी वाढ झाल्याचे प्रजा फाउंडेशनने अहवालात नमूद केले आहे.



'अनेक महिला आपल्यावरील अत्याचाराच्या तक्रारी करण्यासाठी पुढे येत आहेत. त्यामुळं बलात्कार आणि विनयभंगाच्या घटनांची नोंद मोठ्या प्रमाणात होत आहे, असं काही सामाजिक कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे. तर पोलीसांकडून चांगलं सहकार्य मिळत असल्यानं सर्वसामान्यांमध्ये त्यांच्याबद्दलचा दृष्टीकोनही बदलला आहे. पीडित व्यक्ती तक्रार नोंदवण्यासाठी स्वतःहून पुढे येत आहे. त्यामुळं गुन्ह्यांची नोंद होण्याचं प्रमाण वाढलं आहे, असं मुंबई पोलीस दलाचे प्रवक्ते पोलीस उपायुक्त मंजुनाथ शिंगे यांनी सांगितलं. गुन्हे रोखण्याची जबाबदारी पोलिसांची असली तरी त्यासाठीच्या उपाययोजना करण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींकडे असते. २०१७ आणि २०१८च्या राज्य विधीमंडळ अधिवेशनांमध्ये शहरातील आमदारांनी बलात्काराच्या गुन्ह्यांबाबत फक्त नऊ प्रश्न उपस्थित केले. यात दक्षिण मुंबईतील पाच, ईशान्य मुंबईतील दोन आणि उत्तर मुंबईतील दोन आमदारांचा समावेश असल्याचे प्रजा फाउंडेशननं म्हटलं आहे.

## मिरा-भाईंदर परिसरात सोशल राईटस् फाऊंडेशनच्यावतीने महिला दिन मोठ्या थाटात संपन्न





सोशल राईटस् फाऊंडेशनच्या वतीने मिरा भाईदर मधे आयोजित महिला दिन मोठया प्रमाणात महिलांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. सोशल राईटस् मिरा भाईदर कमीटिच्या सचिव आशाराणी रावत यांनी आयोजना कोचींग या ठिकाणी सदर कार्यक्रम घेतला यामधे महिलांच्या आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यासाठी लायन्स क्लब चे माजी गर्व्हरनर नामवंत डॉ.हेमंत दुग्गड यांनी महिलांनी आपल्या आरोग्या बाबत घ्यावयाची काळजी या विषयांवर अत्यंत सुंदर असे मार्गदर्शन केले.

उर्वरित पृष्ठ 4 वर



औद्योगिक क्षेत्रात फारच कमी वेळात विशेष उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल आपल्या सर्वांचे एम.के.घारे ज्वेलर्सचे प्रमुख श्री. उदय महादेव घारे यांना उद्योगश्री प्रकाशनद्वारा आयोजित रौप्यमहोत्सवी सोहळ्यात 'उद्योगश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# दंगली, बलात्कारांत वाढ

**मुंबई- शहरात बलात्कार, छेडछाड, लहान मुलांवरील अत्याचारांसह दंगलींच्या गुन्ह्यांमध्ये वाढ झाली असली तरी लोकप्रतिनिधींना त्यावरील कारवाईत स्वारस्य नाही. विधिमंडळ अधिवेशनांत वाढत्या गुन्हेगारीबाबत प्रश्न उपस्थित करून सत्ताधाऱ्यांसह पोलिसांवर दबाव निर्माण करण्यात लोकप्रतिनिधी अजिबात उत्सुक नसल्याचा दावा 'प्रजा फाऊंडेशन'ने केला आहे.**



शहरातील कायदा व सुव्यवस्था, गुन्हेगारी, गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांच्या उपाययोजना आदींबाबत माहिती अधिकारात मिळवलेल्या तपशिलांद्वारे तयार केलेला अहवाल प्रजा फाऊंडेशनने मंगळवारी जाहीर केला. यावेळी प्रजाच्या संस्थापिका आणि व्यवस्थापकीय विश्वस्त नीताई मेहता, संचालक मिलिंद म्हस्के, योगेश मिश्रा आदींनी अहवालाबाबत माहिती देत निरीक्षणे नोंदवली.

२०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत २०१७-१८ या वर्षांत बलात्काराचे गुन्हे ८३, छेडछाड किंवा विनयभंगाचे गुन्हे ९५ तर दंगली ३६ टक्क्यांनी वाढल्या. त्यासोबत अल्पवयीन बालक, युवकांविरोधातील लैंगिक अत्याचारांमध्येही (पॉस्कोअन्वये) १८ टक्क्यांनी वाढ झाल्याचे माहिती अधिकारान्वये उपलब्ध आकडेवारीतून स्पष्ट होते, असे प्रजाकडून सांगण्यात आले. अनोळखी व्यक्तींकडून घडलेल्या बलात्काराचे प्रमाण, कुटुंबीय किंवा नातेवाईकांकडून घडलेले गुन्हे आदींबाबत प्रजाकडे स्वतंत्र आकडेवारी उपलब्ध नव्हती. हे प्रमाण राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाकडून (एनसीआरबी) प्रसिद्ध होणाऱ्या अहवालातून मिळते.

# समुद्राच्या उधाणामुळे नुकसान झाल्यास आता शेतकऱ्यांना मिळणार आर्थिक मदत



**मुंबई- समुद्राच्या उधाणामुळे शेतपीकाचे किंवा शेतजमिनीचे नुकसान झाल्यास आता शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळणार आहे. आतापर्यंत अशा नुकसानीसाठी शेतकऱ्यांना कोणतीही मदत मिळत नव्हती. पण राज्याचे खारभूमी विकास मंत्री दिवाकर रावते यांनी अशा प्रकरणी मदत देण्यासंदर्भात महिन्यापूर्वी केलेल्या मागणीला अनुसरुन कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. खारभूमी विकास मंत्री दिवाकर रावते व वित्त मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचा समावेश असलेल्या या उपसमितीने मदतीच्या निर्णयास तातडीने मान्यता दिली. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ७०० किमी लांबीच्या कोकण किनारपट्टीवरील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे, असे मंत्री दिवाकर रावते यांनी सांगितले.**

या नवीन निर्णयानुसार आता समुद्राच्या उधाणामुळे कोरडवाहू क्षेत्राचे नुकसान झाल्यास प्रति हेक्टर ६ हजार ८०० रुपये, आश्वासित सिंचन असलेल्या क्षेत्राचे नुकसान झाल्यास १३ हजार ५०० रुपये तर बहुवार्षिक पीकांचे नुकसान झाल्यास १८ हजार रुपये प्रति हेक्टर इतकी मदत मिळणार आहे. शेतपीकाचे ३३ टक्के किंवा त्याहून अधिक नुकसान झाल्यास ही मदत मिळणार आहे. २ हेक्टरच्या मर्यादेत ही मदत मिळेल. याशिवाय समुद्राच्या उधाणामुळे खारे पाणी शेतजमीनीमध्ये घुसून शेतजमीनीचे कायमस्वरुपी नुकसान झाल्यास प्रति हेक्टर ३७ हजार ५०० रुपये इतकी मदत मिळणार आहे. ही नुकसानभरपाई २ हेक्टरपर्यंत जमीन धारण करणाऱ्या अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना मिळणार आहे.

याशिवाय समुद्राच्या उधाणामुळे शेतपीकाचे तसेच शेतजमीनीचे नुकसान होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याचाही सरकारने निर्णय घेतला आहे. त्यानुसार समुद्राचे पाणी शेतात घुसू नये यासाठी खारभूमी प्रतिबंधक बंधारे बांधण्यासाठी १०० कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद उपलब्ध करुन देण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींमध्ये शासनाकडून लोकांना आर्थिक मदत केली जाते. यामध्ये चक्रीवादळ, भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, हिमवर्षाव, टोळधाड, दुष्काळ, ढगफुटी, अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे आदी आपत्तींचा समावेश आहे. या आपत्तीमध्ये आपद्ग्रस्त लोकांना, शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जाते. आपत्तींच्या या यादीमध्ये आतापर्यंत समुद्राच्या उधाणामुळे शेतपीकाच्या होणाऱ्या नुकसानीचा समावेश नव्हता. वास्तविक पाहता समुद्राला येणाऱ्या उधाणामुळे कोकणातील समुद्र तटावरील शेतपीकांचे आणि शेतजमीनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. खाऱ्या पाण्यामुळे अनेक ठिकाणी शेतजमीनीवर कांदळवनाची वाढ होते.

## दहावी, बारावीच्या उत्तरपत्रिका निकृष्ट दर्जाच्या

**मुंबई-** राज्य मंडळाच्या दहावी, बारावीच्या उत्तरपत्रिकांच्या कागदाचा दर्जा यंदा खालावला असल्याची तक्रार शिक्षक आणि विद्यार्थी करत आहेत. उत्तरपत्रिकांची शिवण उसवून पाने सुटी होत असल्यामुळे विद्यार्थी चिंतेत आहेत.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची दहावी, बारावीची परीक्षा सध्या सुरू आहे. यंदा कृतिपत्रिका तुलनेने सोप्या असल्याचे विद्यार्थ्यांचे मत असले तरी विद्यार्थ्यांना सध्या वेगळ्याच चिंतेने घेरले आहे. परीक्षा केंद्रावर जमा केलेल्या उत्तरपत्रिका सुखरूपपणे परीक्षकांच्या हती पडणार का अशी शंका विद्यार्थी व्यक्त करत आहेत. उत्तरपत्रिकांसाठी वापरण्यात आलेल्या कागदाचा दर्जा खालवाला असल्याचे विद्यार्थी आणि शिक्षकांनी सांगितले. टोकदार पेन्सिलने आकृत्या काढल्यास कागद फाटत आहे. त्याचप्रमाणे शाईपेन, जेल पेन यांची शाई कागदावर फुटत आहे, खोडरबरने खोडल्यासही कागद फाटत असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

## मुंबईतील रेल्वे प्रकल्पांना मिळणार ३३ हजार कोटी

**मुंबई-** मुंबई महानगरातील रेल्वे प्रवासाचे चित्र आमूलाग्र बदलून टाकण्याची क्षमता असलेल्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा ३ अ (एमयूटीपी ३ अ) या प्रकल्पाला अखेर गुरुवारी शेवटच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली आहे. मूळ ५४ हजार ७७७ कोटी रुपयांपैकी ३३ हजार ६९० कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाच्या अर्थविषयक उपसमितीने मंजुरी दिली आहे.



गोरेगाव-बोरीवली हार्बर मार्गिकेचे विस्तारीकरण, कल्याण-आसनगाव चौथी मार्गिका, कल्याण-बदलापूर तिसरी आणि चौथी मार्गिका आणि १९१ वातानुकूलित लोकल यासह इतर प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे. पुढील पाच वर्षांत प्रकल्प पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

पश्चिम, मध्य आणि हार्बर रेल्वेमार्गाहून दररोज ७५ ते ८० लाख प्रवासी प्रवास करतात. मुंबई उपनगरात रेल्वेमार्गाचे एकूण ३८५ किमी जाळे विस्तारलेले आहे. सकाळी आणि सायंकाळच्या वेळी मुंबईकरांची जीवघेण्या प्रवासापासून मुक्तता करण्यासाठी मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड (एमआरव्हीसी) द्वारे मुंबई नागरी परिवहन प्रकल्प (एमयूटीपी) हाती घेतले आहेत. या प्रकल्पांमुळे चौपट क्षमता वाढवून मुंबई, ठाणे, रायगड, पालघर या जिल्ह्यांतील प्रवाशांना विशेष लाभ मिळणार आहे. एमआरव्हीसीने ५४ हजार ७७७ कोटी रुपयांचे प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी पाठविले होते. या प्रकल्पांना राज्य सरकारची परवानगी देण्यात आली होती. मात्र केंद्रीय मंत्रिमंडळाची परवानगी मिळणे बाकी होते. शेवटच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ५४ हजार ७७७ प्रकल्पांपैकी ३३ हजार ६९० कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. यामधील काही प्रकल्पांवर फेरविचार करण्यात येणार आहे. प्रवाशांची सुरक्षितता आणि सुखद प्रवासासाठी आपोआप उघडणाऱ्या दरवाज्यांसह वातानुकूलित डब्यांचा समावेश, नवीन रेल्वेमार्गाची निर्मिती, सिग्नल यंत्रणा, गर्दीचा ताण विभागण्यासाठी प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे.

एमयुटीपी ३ अ प्रकल्पांना मान्यता मिळाल्यामुळे भविष्यात मुंबईकरांना उत्तम दळणवळणांची सुविधा मिळणार आहे. या प्रकल्पामुळे मुंबईचा वेग वाढणार असल्याचे मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड (एमआरव्हीसी) जनसंपर्क अधिकारी अनिलकुमार पतके यांनी सांगितले.

एमयूटीपी ३ अ च्या प्रकल्पांसाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार ५०-५० टक्के खर्च करणार आहे. ३३ हजार ६९० कोटी रुपयांपैकी १६ हजार ८४५ कोटी रुपये केंद्र सरकार आणि १६ हजार ८४५ कोटी रुपये राज्य सरकार देणार आहे.

## महापौर निधी जातो कुठे?

**मुंबई-** दुर्धर आजार झालेले गरीब रुग्ण आणि नैसर्गिक आपत्ती किंवा आगीसारख्या दुर्घटनांतील जखमींना आर्थिक मदत पुरविणाऱ्या महापौर निधीत गेल्या काही वर्षांत कोणतीही भर घालण्यात आलेली नाही. गेल्या दहा वर्षांत या निधीचे लेखापरीक्षणही झालेले नाही. त्यातच आता महापौर विश्वनाथ महाडेश्वर यांनी पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी आपले एक दिवसाचे वेतन महापौर निधीसाठी द्यावे, असा प्रस्ताव ठेवला आहे. मात्र, लेखापरीक्षण न झाल्यामुळे निधीत योगदान देण्याबाबत कर्मचारी साशंक आहेत. महापौर निधीतून आपल्याला आर्थिक साहाय्य मिळावे म्हणून, अनेक गरीब रुग्ण पालिका मुख्यालयात खेटे घालतात. या थोड्याथोडक्या मदतीचाही अनेकांना खूप आधार वाटतो. अनेक मुंबईकर या निधीसाठी हातभार लावतात. मात्र गेल्या काही वर्षांत महापौर निधीला उतरती कळा लागली आहे. या निधीच्या नियोजनासाठी अद्याप महापौर समितीच स्थापन झालेली नाही. त्यामुळे पैसा नेमका द्यायचा कुणाला याचा निर्णय घेणारी कार्यकारी समितीही नाही. तरीही ४०० जणांना या निधीतून मदत देण्यात आली आहे. सध्या महापौर निधीमधून फक्त हृदय शस्त्रक्रिया, बायपास, मूत्रपिंड प्रत्यारोपण, डायलिसिस, कर्करोग आणि मोठ्या शस्त्रक्रियांसाठी आर्थिक मदत दिली जाते.



महापौर निधीमध्ये सध्या केवळ २ कोटी १ लाखाच्या मुदत ठेवी असून त्यांच्या व्याजातून गरिबांना मदत दिली जाते. या निधीमध्ये वाढ करण्यासाठी यापूर्वी प्रयत्न केले गेले.

# मराठा आरक्षणावरून आयोगात मतभेद होते का?

**मुंबई-** मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ हस्तक्षेप याचिका करणारे डॉ. बाळासाहेब सराटे यांच्या संस्थेची मराठा समाजाबाबत माहिती संकलनासाठी नियुक्ती करण्याच्या आयोगाच्या




निर्णयावर उच्च न्यायालयाने बुधवारी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मराठा समाज हा सामाजिक-शैक्षणिकदृष्ट्या मागास आहे का हे पाहण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांमध्ये या मुद्द्यावरून भेदभाव होते का, असा सवालही न्यायालयाने उपस्थित केला. त्यावर सुरुवातीला मतभेद होते; मात्र नंतर एकमताने सर्व सदस्यांमध्ये मतैक्य होते, असे सरकारच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

मराठा आरक्षणप्रकरणी दाखल याचिकांवर सध्या नियमित सुनावणी सुरू आहे. बुधवारी झालेल्या सुनावणीत न्यायमूर्ती रणजित मोरे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठाने आयोगाच्या सदस्यांमध्ये मराठा समाज मागास असल्याबाबत मतभेद होते याकडे लक्ष वेधले. त्याला उत्तर देताना या मुद्द्यावरून आयोगाच्या ११ सदस्यांमध्ये सुरुवातीला मतभेद असल्याचे राज्य सरकारच्या वतीने ज्येष्ठ वकील अनिल साखरे यांनी मान्य केले. मात्र असे असले तरी मराठा समाज मागास असल्याबाबतची माहिती पुढे येत गेल्यानंतर आणि चर्चानंतर अखेर सगळ्या सदस्यांमध्ये मराठा समाज मागास असल्याबाबत एकमत झाले. त्यामुळे त्यांना आरक्षण देण्याच्या शिफारशीचा आयोगाने राज्य सरकारला दिलेला अहवाल हा एकमतानेच देण्यात आला होता, असा दावाही साखरे यांनी केला.

# राज्यात चार वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण दुप्पट; माहिती अधिकारातून माहिती उघड

**मुंबई-** राज्यातील ३६० पैकी १५० तालुक्यांमध्ये अर्थात अर्ध्या महाराष्ट्रात नुकताच दुष्काळ जाहीर केल्यानंतर माहिती अधिकारातून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. गेल्या चार वर्षात राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण दुप्पट झाल्याचे समोर आले आहे.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाला लिहीलेल्या पत्रात राज्य सरकारने म्हटले आहे की, २०११ आणि २०१४ या चार वर्षांच्या काळात जेव्हा कॉंग्रेस-राष्ट्रवादीचे सरकार सत्तेत होते तेव्हा ६,२६८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. मात्र, त्यानंतर जानेवारी २०१५ ते डिसेंबर २०१८मध्ये हा आकडा जवळपास दुप्पट झाला आहे. या आकडेवारीत ९१ टक्के वाढ होऊन ११,९९५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे उघड झाले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमुख कारण हे कर्ज, शेतमालाचा भाव आणि पीक पद्धतीशी संबंधित आहे. तसेच आरोग्याचा प्रश्न, ग्रामीण भागातील बेरोजगारी आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही त्यात



समावेश होतो, असे वसंतराव नाईक स्वावलंबन मिशनचे प्रमुख किशोर तिवारी यांनी म्हटले आहे, एनडीटीव्हीने याबाबत वृत्त दिले आहे. राज्यात गेल्या तीन वर्षात पर्जन्यमानात घट झाली होती. दरम्यान, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य सरकारने जून २०१७ मध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली होती. तर दुसरीकडे राज्य सरकार जलयुक्त शिवाय योजनेद्वारे महाराष्ट्र २०१९पर्यंत दुष्काळमुक्त व्हावा यासाठी प्रयत्न करीत आहे. मात्र, या योजनेची आकडेवारीही फसवी आहे.

# डान्सबार सुरू करण्यास मालक नाखूश

**मुंबई-** सर्वोच्च न्यायालयाने अटी शिथिल केल्यानंतरही वेळेचे बंधन कायम असल्याने डान्सबार सुरू करण्यास मालक-चालक फारसे उत्सुक नाहीत. दीड महिन्यांत मुंबई पोलिसांकडे डान्सबारसाठी परवानगी



मागणारे फक्त आठ अर्ज दाखल झाले आहेत. या अर्जांची छाननी करून निर्णय घेण्यास पोलिसांना आणखी एक ते दीड महिन्याचा कालावधी लागणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने १७ जानेवारीला निकाल देताना राज्य शासनाने तयार केलेल्या कायद्यातील काही नियम रद्द केले तर काही अटी शिथिल केल्या. असे असले तरी न्यायालयाने डान्सबार सुरू ठेवण्याचा कालावधी दोन तासांनी कमी केला. शासनाने संध्याकाळी साडेसहा ते रात्री दीड वाजेपर्यंत डान्सबारना परवानगी दिली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने मुदत रात्री साडेअकरापर्यंत आणली व मालकांची अडचण झाली.

लाखो रुपयांची गुंतवणूक करून अवघ्या पाच तासांसाठी डान्सबार सुरू ठेवल्यास फायदा होणार नाही, ही जाणीव असल्याने डान्सबार मालक-चालक अस्वस्थ आहेत. ही बाब 'परफॉर्मन्स बार असोसिएशन'चे अध्यक्ष भरत ठाकूर यांनीही मान्य केली. दुसरीकडे आलेले अर्ज मुंबई पोलीस आयुक्तालयातून संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये शहानिशा करण्यासाठी पाठवण्यात आले आहेत. कायद्यातील तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाने शिथिल केलेल्या अटी-शर्ती लक्षात घेऊन ही शहानिशा होणार आहे. परवाना देण्याआधी संबंधित आस्थापनेने सर्व नियमांचे पालन केले आहे का, अटी-शर्तीची पूर्तता केली आहे का, परिसरातील लोकवस्तीतून तक्रारी नाहीत ना, ही बाबही लक्षात घेतली जाणार आहे.

# अपंगांच्या डब्यांत ६५ हजार घुसखोर

**मुंबई-** अपंगांच्या डब्यात घुसखोरी करणाऱ्यांविरोधात मध्य आणि पश्चिम रेल्वे प्रशासनाने केलेल्या कारवाईत गेल्या दोन वर्षांत तब्बल ६५ हजार प्रवाशांना दंड करण्यात आला आहे. त्यात सरकारी कर्मचारी आणि पोलिसांचाही समावेश आहे. उच्च न्यायालयाने अपंगांच्या डब्यातील घुसखोरीबाबत दिलेल्या आदेशांनंतर कारवाई तीव्र करण्यात आली आहे. जानेवारी २०१७ ते जानेवारी २०१९ दरम्यान मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या अपंगांसाठीच्या डब्यातून प्रवास करणाऱ्या ६५ हजार घुसखोरांवर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे या डब्यातून पोलीस आणि सरकारी कर्मचारीही सर्रास प्रवास करताना आढळले आहेत. मध्य व पश्चिम



रेल्वेवर लोकलमधील अपंगांच्या राखीव डब्यातून सामान्य प्रवाशांना प्रवास करण्यास मनाई आहे. तरीही नियम गुंडाळून सामान्य प्रवासी त्यात घुसखोरी करतात. त्याचा मनस्ताप अपंगांना सहन करावा लागतो. या विरोधात अपंग प्रवाशांनी उच्च न्यायालयात याचिका केली होती. न्यायालयाने कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर रेल्वेने बडगा उगारला होता.

माहिती अधिकार कार्यकर्ते नितीन गायकवाड यांनी पश्चिम आणि मध्य रेल्वे प्रशासनाकडून अपंगांच्या डब्यातून प्रवास करणाऱ्यांवरील कारवाईची माहिती मागवली होती. गेल्या दोन वर्षांत पश्चिम रेल्वेवर ३४ हजार ३३८ सामान्य प्रवाशांनी अपंगांच्या राखीव डब्यात घुसखोरी केली. त्यांच्याकडून ९८ लाख ३० हजार ७०५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. मध्य रेल्वेवरही ३१ हजार सामान्य प्रवाशांविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

पृष्ठ १ वरुन

## २०१९ लोकसभा निवडणुकीचं बिगुल वाजलं!

जम्मू-कश्मीर १, कर्नाटक १४, केरल २०, महाराष्ट्र १४, ओडिशा ६, उत्तर प्रदेश १०, पश्चिम बंगाल ५, दादरानगर हवेली १, दीव दमन १

**चौथा टप्पा – ९ राज्यात ७१ लोकसभा जागांसाठी मतदान**

बिहार ५, जम्मू-कश्मीर १, झारखंड ३, मध्यप्रदेश ६, महाराष्ट्र १७, ओडिशा ६, राजस्थान १३, उत्तर प्रदेश १३, पश्चिम बंगाल ८

**पाचवा टप्पा – ७ राज्यात ५१ लोकसभा जागांसाठी मतदान**

बिहार ५, जम्मू-कश्मीर २, झारखंड ४, मध्यप्रदेश ७, राजस्थान १२, उत्तर प्रदेश १४, पश्चिम बंगाल ७

सहावा टप्पा – ७ राज्यात ५९ लोकसभा जागांसाठी मतदान

बिहार ८, हरियाणा १०, झारखंड ४, मध्यप्रदेश ८, उत्तर प्रदेश १४, पश्चिम बंगाल ८, दिल्ली ७

**शेवटचा टप्पा – ८ राज्यात ५९ जागांसाठी मतदान**

बिहार ८, झारखंड ३, मध्यप्रदेश ८, पंजाब १३, चंडीगढ़ १, पश्चिम बंगाल ९, हिमाचल ४, उत्तर प्रदेश १३

याआधी २०१४ ला झालेल्या १६ व्या लोकसभेच्या निवडणुका ९ टप्प्यांमध्ये झाले होत्या आणि १६ मे रोजी मतमोजणी झाली होती. यात एनडीएने ३३६ जागा, युपीएने ६० जागा आणि इतरांच्या खात्यात १४७ जागा आल्या होत्या.

## मिरा-भाईंदर शहर फेरीवाला समिती बरखास्त?

समिती बरखास्त करण्यात आली होती. दोन वर्षानंतर पुन्हा नव्याने अर्ज घेऊन ३० सदस्य समिती गठीत करण्याचे काम सुरू केले. एका प्रवर्गातील सदस्य संख्या कमी असल्याचे सांगत ते सदस्य निवडीसाठी एक वर्ष लागले आणि अखेर सप्टेंबर २०१८ साल उजाडले. महापालिकेने ३० सदस्य फेरीवाला समितीचे गठन करून त्यांची पहिली बैठक ६ सप्टेंबर २०१८ रोजी बोलाविली. महापालिका आयुक्त बालाजी खतगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महापौर डिंपल मेहता सुद्धा उपस्थित होत्या. त्यावेळी समितीचे अध्यक्ष असलेल्या आयुक्तांनी सदस्यांना त्यांच्या अधिकाराचे तसेच कामाचे स्वरूप सांगितले. त्यानुसार पथ विक्रेते सर्वेक्षणाला सुरुवात केली जाईल आणि दर १५ दिवसांनी समितीची बैठक घेतली जाईल असे पालिका आयुक्तांनी सांगितले होते. परंतु आता ६ महिने होऊन गेले तरी एकही बैठक लावण्यात आली नाही. दरम्यान महापालिका प्रशासनाने रस्त्यावरील फेरीवाला हटाव मोहीम सुरूच ठेवली आहे. तसेच काही भागात भाजी मंडई बांधून काही फेरीवाले त्या जागेत स्थलांतरित केले आहेत. फेरीवाला धोरण निश्चित झालेले नसताना, तसेच समितीला कोणतीही माहिती न देता केलेली कारवाई कितपत योग्य किंवा कायदेशीर आहे का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

सदस्यांनी वेळोवेळी आयुक्तांची भेट घेऊन विचारणा केली असता लवकरच बैठक घेऊ असे सांगण्यात येते. त्यामुळे शहर फेरीवाला समिती बरखास्त केली गेली असल्याचा संशय समिती सदस्य माधवी गायकवाड यांनी व्यक्त केला आहे.

# संपादकीय...

## राज्यकर्त्यांमुळे मराठी भाषा व्हेंटिलेटरवर


संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

महाराष्ट्र राज्याची स्थापना १९६० साली झाली, तेव्हा राज्याचा सगळा कारभार मराठीत व्हावा, हे मान्य झाले. तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हा विलक्षण द्रष्टा माणूस! त्यांनी मराठीसाठी जे स्वप्न पाहिले, ते भव्य-दिव्य होते. ते केवळ स्वप्न पाहून थांबले नाहीत, तर ते सत्यात उतरले पाहिजे, या ध्यासातून त्यांनी मराठीच्या विकासाच्या विविध यंत्रणा निर्माण केल्या. साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोश प्रकल्प, विद्यापीठ पाठ्यपुस्तक मंडळ यांची निर्मिती हे त्याचे फलित. मराठीच्या बाबतीत द्रष्टेपणाने अशी ठाम पावले उचलणारा मुख्यमंत्री महाराष्ट्राला पुढे लाभला नाही, हे विधान दुर्दैवाने करावे लागते. मराठीसाठी राज्यात स्वतंत्र भाषा विभाग अस्तित्वात आला, तोही राज्याच्या स्थापनेनंतर तब्बल पन्नास वर्षांनी! तो विभाग अस्तित्वात येण्यासाठी मराठी अभ्यास केंद्राने सातत्यपूर्ण तगादा लावला. इतकेच नाही, तर विभागाची रचना कशी असावी, याचा सविस्तर आराखडा शासनाला सादर केला. तो आराखडा म्हणजे राज्यातील भाषा नियोजन कसे असावे आणि त्याकरिता आर्थिक बाबींपासून भाषा विकासाच्या कामापर्यंतचे नियोजन कसे असावे, याचे अत्यंत सखोल आणि विचारपूर्वक मांडलेले प्रारूप होते. अनेकदा पाठपुरावा करूनही विद्यमान भाषाविभाग मंत्र्यांनी त्या आराखड्याच्या चर्चेस केंद्रांच्या सदस्यांना बोलविले नाही. महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्याकडे राज्याच्या भाषा विभागाची जबाबदारी आहे. उत्सवी स्वरूपाच्या घोषणा करणे ही शिक्षणमंत्री महोदयांची प्रिय शैली आहे. त्यांनी तसे वेगवेगळे अनपेक्षित धक्के तमाम शिक्षणक्षेत्राला वेळोवेळी दिले आहेत. त्याविषयी बोलण्याचा मोह टाळून नुकत्याच साजरा झालेल्या भाषादिनाला त्यांनी व्यक्त केलेल्या मतांबद्दल माध्यमांतून जे चित्र समोर आले, त्याने जाणवलेली अस्वस्थता व्यक्त केल्यावाचून राहवत नाही, म्हणून हा लेखप्रपंच! त्यांना मराठी सक्तीची करणे म्हणजे लोकांच्या पायात बेड्या घालणे वाटते. राज्याचे शिक्षणमंत्री आणि मराठी भाषा विभागाचे मंत्री म्हणून शिक्षणातल्या मराठीबाबतची त्यांची ही विधाने म्हणजे शुद्ध 'भाषाद्रोह' आहे. त्यांची ही भूमिका कधी छुपेपणाने कधी उघडपणाने त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलेली आहे. या भाषादिनाला तर 'मराठी सक्तीची करता येणार नाही' असे त्यांचे मत असल्याचे स्पष्टच झाले आहे. केरळ, तामिळनाडू अगदी अलीकडे अस्तित्वात आलेल्या तेलंगणातदेखील त्यांच्या-त्यांच्या भाषेची सक्ती करणे, त्या-त्या राज्याला जमते, पण आमच्या महाराष्ट्रात मात्र शिक्षणात मराठीचा आग्रह धरणे शिक्षणमंत्र्यांनाच पटत नाही. असा आग्रह धरून आमचे लोक मागे पडतील, असे त्यांना वाटते. फ्रेंच, जर्मन, जपानीसारख्या विदेशी भाषा रुजविणे नि त्या राज्यात वाढविणे ही आमच्या राज्य शासनाची जबाबदारी आहे काय? पुस्तकांचे गाव उभारणे, स्पर्धा-कार्यक्रमांचे 'इव्हेंट' करून, मराठी जगविणे अशा गोष्टींना उचलून धरणाऱ्या शिक्षणमंत्र्यांना शिक्षणातील मराठी जगली पाहिजे, असे वाटत नाही काय? भाषाधोरणावर काम करणाऱ्या डॉ.नागनाथ कोत्तापल्ले समितीच्या कार्यकाळाचे २०१४ साल हे बहुधा शेवटचे वर्ष होते. कोत्तापल्ले समितीने तयार केलेला मसुदा हा जनतेसमोर ठेवून शासनाकडून सूचना मागविल्या गेल्या होत्या. वेगवेगळ्या विद्यापीठांमधून त्या मसुद्यावर चर्चा घडल्या होत्या. मुंबई विद्यापीठात आयोजित अशाच एका चर्चेत मीही सहभागी झाले होते. त्या वेळी 'विद्यमान शिक्षणमंत्री महोदयांना सकारात्मकच बोललेले आवडते,' असे शासनाच्या वतीने प्रास्ताविक भाषणात सांगितले गेले. त्या वेळी वाटले, सकारात्मक आवडणाऱ्या मंत्रीमहोदयांकडून धोरणावर नक्कीच काहीतरी सकारात्मक होणार, पण त्या भ्रमाचा भोपळा फुटला. कोत्तापल्ले समितीने अल्पावधी वाढवून मागितला होता, पण त्यांना तो न देता डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली नव्या समितीची स्थापना करण्यात आली. कोत्तापल्ले समितीनेही शिक्षणातील मराठीबाबत ठामपणे सूचना केलेल्या होत्या आणि डॉ. मोरे यांच्या अध्यक्षतेखाली काम करणाऱ्या समितीनेदेखील आपला अंतिम मसुदा शासनाला सादर करूनही वर्ष लोटलेले आहे, असे असूनही '८० टक्केच भाषाधोरण तयार आहे.' असे यंदा भाषादिनी शिक्षणमंत्री म्हणतात, ते का म्हणून? म्हणजे या धोरणात अशा काही सूचना मराठीबाबत आहेत की काय, ज्या शासनाला धोक्याच्या वाटतात? राजकारणात भल्या-भल्यांचे बळी जातात, असे कायमच ऐकले आहे, पण राजकारणात भाषेचा बळी जाताना आज स्पष्ट दिसतो आहे. प्रत्यक्ष भाषा धोरण जाहीर करण्यापेक्षा 'धोरण-धोरण' खेळण्यातच तावडे यांना रस आहे. मराठी जगण्याकरिता तिचे अभ्यासक्रमातील स्थान जपणे गरजेचे आहे. आपली भाषा जगात टिकविण्यासाठी अनेक पातळ्यांवर तिची सक्ती केली जाते, ते गैर नाही. आज जगात बोलबाला असलेली इंग्रजीही लॅटिन नि ग्रीकची सत्ता मोडून काढून सक्तीनेच टिकविली गेली. महाराष्ट्र हा एकमेव असा प्रदेश आहे, जेथे या राज्याची भाषा टाळून परक्या भाषा शिकण्याचा परवाना दिला जातो. आज शासन उदासीन नि समाज तटस्थ अशा कात्रीत मराठी आहे. व्यक्तिमत्त्व बहरते, ती आपली भाषा बेडी वाटू लागली, याचे कारण आपली बेगडी मानसिकता हे आहे. आपण जिच्यायोगे भरारी घ्यायची तिचेच पंख छाटणार आहोत का?

# नाणार जाणार, कोकणात काय येणार?



**नाणारच्या निमित्ताने पुन्हा एक पाऊल मागेच पडले आहे का? याचा विचार करावा. रेल्वे आली आहे. चौपदरीकरण होते आहे. जलमार्ग सुरू करण्याचा आग्रह धरावा. विमानतळे होत आहेत. वैद्यकीय महाविद्यालय व्हावे. रत्नागिरीला स्वतंत्र विद्यापीठ व्हावे. पर्यटनासाठी शहरे विकसित करावीत आणि या सर्वांसाठी मुंबईची वाट न धरता येथे मोठा मध्यमवर्ग कसा निर्माण होईल याचाही विचार मांडला जावा!**

संयुक्त महाराष्ट्राचे महामंथन चालू होते तेव्हा मुंबईसह महाराष्ट्रातील अनेक शहरे चळवळीची केंद्रे बनली होती. स्वातंत्र्याच्या तेरा वर्षांनंतर महाराष्ट्राची स्थापना झाली. त्या दरम्यान मुंबई प्रांत, द्विभाषिक मुंबई प्रांत (गुजरातसह) आणि नंतर महाराष्ट्र अशा टप्प्याने मराठी माणसांचा महाराष्ट्र स्थापन झाला. मुंबई प्रांतात मुंबईसह कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, उत्तर कर्नाटक आणि गुजरातचा प्रांत एकत्र होता. मराठवाडा आणि विदर्भ अनुक्रमे हैदराबाद आणि मध्य भारत प्रांतात समाविष्ट होता. संयुक्त महाराष्ट्राची मुख्य लढाई मुंबई आणि बेळगावसह कारवार वगैरे भागासाठी चालू होती. मुंबई त्याकाळी मराठी भाषिकांच्या वर्चस्वाखाली असली तरी आर्थिकदृष्ट्या सधन वर्ग मुंबई केंद्रशासित व्हावी यासाठी प्रयत्नशील होता. मुंबई बहुभाषिक त्या काळातही होती; पण मराठी टक्का अधिक होता. त्यामुळे लोकशाही मार्गाने मराठी माणसांचेच वर्चस्व निर्माण होणार होते. तेव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे, असे म्हटले जात होते. त्यात मराठी सामान्य माणूस आपला लढा देत होता. स्वातंत्र्य चळवळीतदेखील मुंबईचा मराठी गिरणी कामगार आणि कोळी बांधवच आघाडीवर होता. हे विसरून चालणार नाही. त्याच जोरावर मुंबईतील सर्व चळवळी किंवा लढे लढले गेले. लोकमान्य टिळक यांना मुंबईत बळ देणारा हा मराठी कामगार आघाडीवर होता.

सामान्य मराठी माणूस आणि सधन वर्ग अशीच विभागणी झाली होती. गुजरातला स्वतंत्र राज्य हवे होते आणि जमले तर मुंबईपण हवी होती. ती पूर्ण नाही मिळाली तरी चंदीगढप्रमाणे पंजाब आणि हरयाणात विभागले गेले तसे तरी ही महानगरी विभागून दोघांचा हक्क सांगण्याचा प्रयत्न होता. मात्र, लढवय्या मराठी माणूस अखेरपर्यंत लढून मुंबई मराठी माणसांची केली तेव्हा हा सधन वर्ग म्हणायचा की, 'मुंबई तुमची, मात्र भांडी घासा आमची' हा सामान्य मराठी माणसाला हिणवण्याचा प्रयत्न होता. वस्तुस्थिती अशी होती की, मुंबईतला मूळ मराठी माणूस हा मध्यमवर्गीय होता आणि दुसऱ्या बाजूने कोकणासह पश्चिम घाटातला सह्याद्री पर्वत रांगांतील गावोगावचा कामगार वर्ग पोट भरण्यासाठी मुंबईत वास्तव करून होता. तो पडेल ते काम करीत होता. तो गिरणी कामगार होता. तो मार्केटमध्ये हमाली करीत होता. बंदरावरील डॉक यार्डात गोदी कामगार म्हणून राबत होता. त्यामध्ये सर्वाधिक भरणा कोकणाचा होता. तसाच सह्याद्री पर्वत रांगांत पसरलेल्या तालुक्यांतील होता. आज मोठ्या प्रमाणात मुंबईतील कामगार वर्ग हा बाजार समित्यांमध्ये माथाडी कामगार म्हणून आहे. गोदीमध्ये गोदी कामगार आहे. कापड गिरण्यांचा अस्त झाल्याने तो वर्गच संपला.

मुंबईची रचना पाहिली तर अनेक भाग हे कामगारांच्या वस्त्यांनी गजबजलेले होते. लालबाग, परळ, डिलाईल रोड किंवा ना. म. जोशी मार्ग हे कामगार वस्त्यांचे भाग होते. दादर, प्रभादेवी, शिवाजी पार्क, विलेपार्ले, आदी भाग मध्यमवर्गीय मराठी माणसांचे होते. यापैकी कामगार वर्गाचे भाग आता मराठी माणसांच्या वस्त्यांनी रिकामे होऊन तेथे कॉर्पोरेट कंपन्यांची कार्यालये उभी राहिली आहेत. मूळ मुंबई किंवा ज्याला दक्षिण मुंबई म्हणतात तेथून मराठी माणूस आता हद्दपारच होऊ लागला आहे. तो दूरवर वसई-विरारपासून नव्या मुंबईतील खारघरपर्यंत दूरवर फेकला गेला आहे. आजही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून आलेला किंवा येणारा माणूस गावाकडे चांगले जीवन जगूच शकत नाही म्हणून ही अवस्था आहे. पेण-पनवेलपासून सावंतवाडीच्या पलीकडे गोव्याच्या सीमेवर बांदापर्यंतचा कोकणी माणूस मुंबईत आपले नशीब आजमावतो आहे. परिणामी, कोकणची आर्थिक नाडी आजही मुंबईवरच चालते.

रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या संपन्न प्रदेशात विकासाचे योग्य नियोजन होत नसल्याने कोकणातील तरुण-तरुणी मुंबईकडेच आशेने पाहत आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकमेव जिल्ह्याची लोकसंख्या उणे ठरली ती सिंधुदुर्ग जिल्ह्याची. २००१ च्या तुलनेने २०११ मध्ये या जिल्ह्याची लोकसंख्या साडेसात हजारांने घटली आहे. कारण आजही या भागातून लोकांचे मुंबईकडे स्थलांतर चालूच आहे. त्यापेक्षा थोडे कमी असले पण रत्नागिरी जिल्ह्यातूनही स्थलांतर नियमित होते आहे. हा उलटा प्रवास रोखण्यासाठी कोकणाचा विकासाचा मार्ग मोकळा करायला हवा होता तो झाला नाही. केवळ घोषणा होत राहिल्या. पायाभूत सुविधांचा वेग कासव गतीने चालू आहे. नव्वदीच्या दशकात कोकण रेल्वे धावू लागली आणि आता कोठे एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण होऊ घातले आहे. कोकण किनारपट्टीवर पर्यटनाचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास करायला हवा होता, तो झाला नाही. १९९५ मध्ये युतीचे सरकार सत्तेवर आल्यावर मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटनाचा दर्जा दिला. पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला. मात्र, प्रत्यक्षात काही घडलेच नाही. याउलट गोव्याने बाजी मारली. आज संपूर्ण महाराष्ट्र आणि कर्नाटकासह सारा देश, तसेच विदेशातील पर्यटकांची पावले गोव्याकडे वळतात. याचे कारण गोव्याला नवे रूप दिले. नव्या युगातील पर्यटकांच्या गरजा ओळखून युरोपसारखा आकार गोव्याला देण्यात आला. यामध्ये मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांचा पुढाकार महत्त्वाचा ठरला. पणजीसारखे शहर युरोपातील शहरांच्या तुलनेचे झाले आहे. जेमतेम पंधरा लाख लोकसंख्येचा गोवा त्याच्या चौपट संख्येने पर्यटकांना खेचतो आहे. समुद्रकिनारे सुंदर केले. पायाभूत सुविधा उभ्या केल्या. नव्या संकल्पना राबविल्या गेल्या. चित्रपट महोत्सव, संगीत महोत्सव, आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्याख्यानमाला, देश-परदेशांचे ब्रॅन्ड येतात. कॅसिनोसुद्धा आला. क्रुझवर जाण्याची सोय झाली. कला, संगीत, साहित्य, चित्रपट, आदींची जोड देण्यात आली. गोव्याची खाद्यसंस्कृती विकसित झाली. आज गोव्याला आपल्या क्षमतेपेक्षा जादा सोयी-सुविधा पर्यटकांना निर्माण करून देण्याची गरज निर्माण झाली आहे.

अलिबाग-उरणपासून वेंगुर्लेजवळच्या भोगवेपर्यंतचा समुद्रकिनारा सुंदर आहे. अनेक ठिकाणे ही निसर्गदत्त समृद्ध आहेत; पण त्या ठिकाणी आधुनिक सुविधांची वाणवा आहे. दापोली, रत्नागिरी, मालवण आणि वेंगुर्लासारखी शहरे विकसित करायला हवी होती. हिंदी जाऊ द्या, निदान मराठी चित्रपटांचे महोत्सव तरी व्हायला हवे होते. रत्नागिरी शहर आधुनिक सुविधांनी विकसित करायला हवे होते. सिंधुदुर्ग जिल्ह्याला पर्यटन जिल्हा म्हटले गेले, पण केले काहीच नाही. कोकणाची संस्कृती इतिहास, साहित्य, कला दर्शविणारे राष्ट्रीय म्युझियम एकही नाही. हा सर्व बदल करायला मध्यमवर्गीय माणूस वाढला पाहिजे. जो काही आहे तो मुंबईच्या तुटपुंज्या पुंजीवर घरदार बांधतो आहे. थोड्याफार फळबागा विकसित करतो आहे. शैक्षणिक संस्था, रुग्णालये, विद्यापीठ, संशोधन संस्था, चित्रपट निर्मितीची केंद्रे, कला सादर करणारी कलादालने उभी करायला हवी होती. त्याला येणारा प्रेक्षक वर्ग केवळ पर्यटक असून चालणार नाही.

# उलवे-द्रोणागिरीतील इमारतींची ओसी बंद

## सिडकोचे दात घशात; नगरविकास विभागाचा दणका

***ठाणे : सिडको क्षेत्रात बांधकाम चालू असलेल्या आणि पूर्ण झालेल्या प्रकल्पांत ज्या विकासकांनी विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकाम केले नाही, अशा सर्व इमारतींची ओसी अर्थात भोगवटा प्रमाणपत्र देणे थांबवा, असे आदेश नगरविकास विभागाने ५ मार्च २०१९ रोजी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिले आहेत. याचा फटका उलवे-द्रोणागिरीतील शेकडो इमारतींना बसणार आहे.***

यापूर्वी नगरविकास विभागाच्याच आदेशानुसार पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व इमारतींच्या ओसी थांबविल्या आहेत. मात्र, सिडकोने त्या थांबविल्या नव्हत्या; परंतु याबाबत पाठपुरावा आणि मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित एका याचिकेचा हवाला देऊन नगरविकास विभागाने सिडकोस हा दणका दिला आहे.

**उलवे-द्रोणागिरीतील बिल्डरांना मोठा फटका**

ज्या इमारती बांधकाम नियमावलीप्रमाणे असतील, त्यांनाच ओसी द्यावी, असे निर्देश नगरविकास विभागाने सिडकोस दिले आहेत. या आदेशानुसार सिडकोच्या कार्यक्षेत्रातील उलवे, द्रोणागिरी नोडमधील शेकडो इमारतींचे भवितव्य धोक्यात येणार असून, हजारो रहिवाशांची संभाव्य फसवणूक टळण्यास मदत होणार आहे. बिल्डरांकडून त्यांच्या प्रकल्पांची जाहिरात देऊन नोंदणीद्वारे कोट्यवधींची फसवणूक सुरूच आहे.

**सिडकोस नगरविकासचा दणका?**

अनेक बिल्डरांनी विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करून इमारती बांधलेल्या असतानाही सिडकोने त्यांना बांधकाम परवानग्या दिल्या. या बांधकाम परवानग्या बेकायदेशीर व नियमबाह्य असल्याचा अहवाल पुणे येथील नगररचना संचालकांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव नितीन करीर यांच्याकडे सादर केला होता, त्यामुळे शासनाने या बाबत कठोर भूमिका घेऊन अशा परवानग्या देणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याचे स्पष्ट आदेश ३ ऑगस्ट २०१७ रोजी सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिले होते. मात्र, त्यानंतरही त्यांनी आपल्या दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालून त्यांच्यावर कारवाई न करता त्यांचे म्हणणे ऐकून तसा अहवाल नगरविकास विभागास पाठविला होता. त्या अहवालानुसार नगरविकास विभागाने थेट सिडको कार्यक्षेत्रातील बांधकाम नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या सर्व इमारतींची ओसी थांबविण्याचे आदेश देऊन सिडकोचे दात त्यांच्या घशात घातले आहेत.



**पनवेल महापालिकेने यापूर्वीच थांबविल्यात ओसी**

नवी मुंबईतील पनवेल महापालिका आणि सिडकोच्या कार्यक्षेत्रातील शेकडो इमारती या बांधकाम नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करून बांधल्याचे वृत्त प्रकाशित केले होते. यात खारघर, करंजाडे, तळोजा, कामोठे, रोडपाली, कळंबोली परिसरातील इमारतींचा समावेश आहे. त्यानंतर नगरविकास विभागाच्या आदेशानुसार पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील ३५ इमारतींच्या ओसी डिसेंबरमध्ये थांबविल्या आहेत.

## ठाण्यात नवरा-बायकोचा किरकोळ वाद आईसह दोन वर्षाच्या चिमुरडीचा मृत्यू

ठाण्यात नवरा-बायकोमध्ये झालेला किरकोळ वाद दोघांच्या जिवाशी आला आहे. भिवंडीमध्ये नवऱ्याबरोबर किरकोळ भांडण झाल्यानंतर पत्नीने स्वतःला पेटवून घेतले. या आगीत भाजल्याने तिच्यासह दोन वर्षाच्या चिमुरडीचाही मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या दुर्घघटनेत पतीही गंभीर जखमी झाला आहे. सस्मिता मलिक आणि दोन वर्षाची चिमुरडी सुबोस्त्री मलिक अशी मृत मायलेकींची नावं आहेत.

भिवंडीजवळील भाडवड ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या एका चाळीच्या खोलीत मलिक कुटुंब राहते. नवरा-बायकोमध्ये झालेल्या किरकोळ वादातून टोकाला जाऊन २८ वर्षीय सस्मिताने स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून घेतले. पाहता पाहता ही आग संपूर्ण घराला लागली आणि आगीचा मोठा



भडका उडला. या आगीच्या भडक्यात सस्मितासह पती रतिकांत आणि दोन वर्षीय चिमुरडी सुबोस्त्री भाजल्याने गंभीर जखमी झाले होते. उपचारादरम्यान पत्नी आणि दोन वर्ष सुबोस्त्री चिमुरडीचा मृत्यू झाला. रतिकांत गंभीर जखमी आहेत. त्यांच्यावर उचपार सुरू आहेत.

# सर्व पोलीस ठाण्याच्या प्रमुख बनल्या महिला पोलीस

**नालासोपारा :** पोलीस खात्यात काम करत असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षकाच्या खुर्चीत बसणं हे प्रत्येक पोलिसाचं स्वप्न असतं. साहेबां सारखा रूबाब, जरब याचं आकर्षण असतंच आणि त्याशिवाय त्यांच्याप्रमाणे धडाडीचे निर्णय घेण्याची इच्छाही असते. महिलापोलिसांचे हे स्वप्न बुधवारी पुर्ण झाले. निमित्त होते महिला दिनाचे. महिलांच्या या खास दिवशी वसईतील सातही पोलीस ठाण्यात महिला पोलीस उपनिरीक्षकांना एक दिवसाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बनविण्यात आले तर महिला हवालदारांना ठाणे अमंदलार बनविण्यात आले. या महिलाराजमुळे शुक्र वारी वसई तालुक्यातील महिला पोलिसांचा दिवस खास ठरला होता.

शुक्रवारी जागतिक महिला दिनी विविध कार्यक्र मांनी साजरा झाला. पालघर पोलीस अधीक्षक गौरव सिंग आणि वसई विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक विजयकांत सागर यांनी



महिला पोलिसांना अनोख्या पध्दतीने मानवंदना देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार महिला पोलीस उपनिरिक्षकांना एक दिवसांचे पोलीस ठाण्याच्या प्रमुख पद देण्याचे ठरवले. तर पोलीस नाईक आणि पोलीस हवालदार दर्जाच्या महिला कर्मचाऱ्यांना पोलीस ठाणे अमंलदार बनविण्याचे ठरवले. या आगळ्यावेगळ्या कल्पनेला सर्वांनी चांगला प्रतिसाद दिला.

सहायक पोलिस निरीक्षक अर्चना दुसाने यांना तुळींज, पोलीस उपनिरीक्षक सरला काळे यांना वालीव, पोलीस उपनिरीक्षक अनिता पवार यांना माणिकपूर पोलीस उपनिरीक्षक परवीन तडवी आणि लक्ष्मी बोरकर यांना विरार येथे एक दिवसांचे पोलीस निरीक्षक बनविण्यात आले तर महिला पोलीस नाईक दीपाली कदम यांना नालासोपारा, पोलीस नाईक जयंती राजगुरू यांना एक दिवसाचे ठाणे अंमलदार बनविण्यात आले. यावेळी सर्व महिला पोलीस कर्मचारी आणि अधिका-यांचा सत्कारही करण्यात आला.

# सरकारी निधीवर डल्ला मारण्याचा प्रयत्न

**ठाणे-** आरोग्याविषयी शहरात विविध कार्यक्रम राबविण्यासाठी सरकारकडून ठाणे महापालिकेला मिळालेल्या कोट्यवधी रुपयांच्या निधीवर डल्ला मारण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नौपाडा येथील बँकेतील खात्याच्या बनावट चेकवर पालिका आयुक्त आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या खोट्या सह्या करून कोट्यवधी रुपयांचे तीन वेगवेगळे चेक पुणे आणि चेन्नई येथील बँकेत वटविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र बँकेच्या अधिकाऱ्यांनी वेळीच ही बाब पालिका अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिल्यानंतर तात्काळ पेमेंट थांबविण्यात आल्याने पुढील मोठी फसवणूक टळली. या प्रकरणी पुण्यातील एका फाऊंडेशनच्या अध्यक्षाला चौकशीसाठी नौपाडा पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याचे समजते.

# नवी मुंबईत 'अनधिकृत'वर बांधकामांवर करडी नजर

**नवी मुंबई -** नवी मुंबईतील बांधकांचा प्रश्न अजून सुटलेला नाही. त्यामुळे २०१५पर्यंतच्या बांधकामांना अभय देत सरकारने त्यानंतर नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम करू नये, असे स्पष्ट शब्दांत सुनावले आहे. मात्र असे असले तरी शहरात अनेक ठिकाणी आजही मोठ्या प्रमाणात बांधकामे होत आहेत. त्यामुळे अशा अनधिकृत बांधकामांना चाप बसावा, यासाठी पालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागाच्या वतीने संबंधितांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर अशा बांधकामांची यादी पालिकेने जाहीर केली आहे. नागरिकांनी या बांधकामांमध्ये सदनिका किंवा गाळे खरेदी करू नये, असे आवाहन नागरिकांना केले आहे.

शहरात ज्याप्रमाणे गावठाणांमध्ये हवी तशी बांधकामे झाली आहेत, तशीच बांधकामे सिडकोच्या वतीने उभारल्या गेलेल्या जुन्या इमारतींमध्येही झाली आहेत. कोपरखैरणेमधील माथाडी वसाहत, नेरूळमधील एलआयजीसारख्या वसाहतीमध्ये आता दोन माजली, तीन मजली बांधकामे उभी राहिली आहेत. त्यामुळे नियोजनबद्ध उभारलेल्या या वसाहती आता बकाल होऊ लागल्या आहेत. या वसाहतींमध्ये पुढची



, मागची जागा आत घेऊन, बांधकामे अनधिकृतपणे वाढवली जात आहेत. त्यामुळे या वसाहतींमधील सोयीसुविधांवर ताण पडत आहे. अशा प्रकारची बांधकामे इतरांना विकण्याचे प्रकारही सुरू आहेत.

याचप्रमाणे शहरात अनेक ठिकाणी मंजूर नकाशाव्यतिरिक्त बांधकाम केले जात आहे. काही ठिकाणी तळ मजल्यावर मोकळ्या जागेत बांधकाम केले गेले आहे. अनेक सोसायट्यांमध्ये तर मोकळ्या जागेवर पाण्याची टाकी उभारणे, सुरक्षारक्षकांची खोली उभारणे, असे प्रकार सर्रास होत आहेत. अनेक ठिकाणी गच्चीवर मोकळ्या जागेत पत्रा टाकून बांधकाम बंदिस्त करून त्या ठिकाणी रहिवासी वापर सुरू करण्यात आला आहे. मात्र अशा प्रकारची बांधकामे बांधकाम नियमांनुसार चुकीची असून त्यावर अंकुश बसणे गरजेचे आहे. त्यामुळे पालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागानुसार या अशा बांधकामांची यादी तयार करण्यात आली आहे. ती जाहीरही करण्यात आली आहे.

**खरेदी न करण्याचे आवाहन**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६अन्वये अनधिकृत इमारती, बांधकामांविरुद्ध नोटिसा बजावण्यात आल्या असून सर्व नागरिकांना परिपत्रकानुसार आवाहनही करण्यात आले आहे. अशा प्रकारची बांधकामे, इमारती या अनधिकृत असून त्यामध्ये सदनिका, गाळे खरेदी करू नये, त्यात फसगत होण्याची दाट शक्यता आहे, असे यात म्हटले आहे. पालिकेने जाहीर केलेल्या या यादीमध्ये अनेक खासगी बांधकामे असून, सोसायट्यांमधील बांधकामांचाही समावेश आहे. बेलापूर विभागात अशा प्रकारची २३ बांधकामे आहेत. नेरूळमध्ये २० प्रकरणे आहेत. तर कोपरखैरणेमध्ये अशा २० बांधकामांचा समावेश आहे. या अनधिकृत बांधकामांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.**

# बॅनर, फ्लेक्स काढण्याला आणि बोर्ड रंगवण्याला महापालिकेने केली सुरूवात



**पुणे-** लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता रविवारी पाच वाजल्यापासून लागल्याने महापालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. राजकीय पक्षांचे फ्लेक्स, बॅनर, झेंडे काढण्याला सुरूवात केली असून, स्थायी स्वरूपात लावलेल्या बोर्डांवरही स्टिकरिंग करण्याला सोमवारपासून सुरूवात केली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने रविवारी वार्ताहर परिषद घेऊन निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या. संपूर्ण देशभरात चार टप्प्यांमध्ये ही निवडणूक होणार असून, पुण्यात २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत मतदारांवर प्रभाव पडू नये यासाठी त्यांच्याशी संबंधित जाहिररित्या लावण्यात आलेल्या गोष्टींवर महापालिकेने कारवाई करण्याला सुरूवात केली आहे. राजकीय पक्षांनी किंवा राजकीय व्यक्ती, लोकप्रतिनिधी यांनी शहरभर वाढदिवस, शुभेच्छा, अभिष्टचिंतन, नियुक्त्या, जाहीर कार्यक्रम, सण समारंभांचे बोर्ड, दुरुस्त्या, निधीतून केलेल्या कामांचे बोर्ड, नामफलक, दिशादर्शक, सोसायट्यांमधील बंगल्यांची नावे असलेले एकत्रित बोर्ड खाली असलेली सौजन्यांवरील नावे, बॅनर, फ्लेक्स, विविध वस्तूंचे वाटप, सांस्कृतिक कार्यक्रम, लकी ड्रॉ, हळदीकुंकू समारंभाचे बोर्ड, अन्य सौजन्यावरील नावे, बॅरीकेडस, सार्वजनिक ठिकाणी ठेवलेले बेंचेसवरील नावे, वाचनालये, उद्घाटन समारंभ, अनावरण, कोनशिला, स्वच्छ सर्वेक्षणातून रंगवलेल्या भिंतींवरील माननीयांची नावे, पक्षाचे चिन्ह, तसेच चिन्हाशी साधर्म्य असलेले चिन्ह यांचा यामध्ये समावेश आहे.

महापालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागातर्फे ही कारवाई करण्यात येते. विभागाने १५ क्षेत्रीय कार्यालयांना या संदर्भात आदेश दिले असून, क्षेत्रीय कार्यालयांनी या कामासाठी दोन-तीन पथके नेमली आहेत. या पथकांकडून ही कारवाई केली जात आहे. तात्पुरत्या स्वरूपात लावलेले फ्लेक्स, बॅनर काढून टाकले जाणार आहेत, तर अन्य स्थायी स्वरूपातील स्ट्रक्चर किंवा बोर्ड स्टीकरच्या सहाय्याने झाकून टाकले जाणार आहेत.

स्वच्छ भारत सर्व्हेक्षणांतर्गत रंगवलेल्या भिंतींवर माननीयांनी स्वत:ची नावे 'संकल्पने'च्या माध्यमातून लिहिली आहेत. ती नावे ज्या रंगांनी काढली आहेत त्याच रंगांचा वापर हे घालवण्यासाठी केला जाणार आहे.



**जागतिक महिला दिनानिमित्त दि. ८ मार्च २०१९ रोजी साईनगर गार्डन अन्धेरी पूर्व येथे सिनिअर सिटीझन सोशल राईटस फाउंडेशनच्यावतीने ज्येष्ठ नागरिकांनी महिलांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माधवबाग क्लिनिकच्या शितल गुणदेकर यांनी महिलांना ब्लड प्रेशर, हार्ट, मधुमेह, शरीराची काळजी कशी घ्यावी, तपासणी याची माहिती दिली. यावेळी अनंत दाभोळकर यांनी महिलांचे अधिकार यांची माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय उप सचिव संतोष चौधर यांनी केले. कार्यक्रमाला पंढरीनाथ खंडागळे, वासुदेव पास्टे. सह अनेक ज्येष्ठ उपस्थित होते. या कार्यक्रमाला महिलांची उपस्थिती वाखाणण्या जोगी होती.**

# टाटाची ही इलेक्ट्रीक कार फुल चार्ज केल्यानंतर धावेल ३०० किमी

**नवी दिल्ली-** जिनेव्हा मोटर शोमध्ये, टाटा मोटर्सने आपल्या फ्यूचर इलेक्ट्रिक कार संकल्पनेवरुन पडदा उचलल्यानंतर भारतीय ऑटोमोबाईल क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. टाटाच्या हॅचबॅक अॅल्ट्रोस ईव्ही बद्दल लोकांना जाणून घेण्याची इच्छा आहे. टाटाची ही इलेक्ट्रिक कार एकदा चार्ज केल्यानंतर ३०० किलोमीटर अंतर पार करु शकते. टाटाने यासोबतच याकारचे पेट्रोल व्हर्जन देखील लाँच करणार आहे. टाटा मोटर्सची नवीन हॅच–बॅक अॅल्ट्रोस ईव्ही अल्फाएआरसी (एजिल लाईट फ्लेक्झिबल अॅडव्हान्स) मॉड्यूलर प्लॅटफॉर्मवर तयार केली जाईल. त्याच वेळी, हे अल्टरोझ पेट्रोलच्या स्वरूपात दिसून



येईल. अल्टोसमध्ये उच्च ड्युएल एलईडी दिवे आहेत. याव्यतिरिक्त १६-इंचाचे युनिक ड्युअल टोन अॅलोय व्हील मिळेल. त्याचबरोबर पेट्रोल व ईव्हीमध्ये मागच्या दरवाजावर पिलर माउंटेड हँडल्स दिले जातील. त्याचबरोबर मागील बाजूस स्पिल्ट टेल लॅम्प्स देण्यात येणार आहेत.

अॅल्ट्रोस ईव्हीच्या इंटीरिअर बाबत बोलायचे झाले तर, याचे पेट्रोल व्हर्जन ब्लॅक रंगामध्ये उपलब्ध होईल, तर इलेक्ट्रीक आवृत्तीमध्ये ड्यूअल-टोन इंटिअर असेल. त्याचबरोबर यात मोठ्या टचस्क्रीन स्क्रीनसह टच-आधारित नियंत्रण वातानुकूलन केंद्र असेल. त्याचवेळी टाटा जेएलआर कारांना इस्पिरेटेड रोटरी स्टाईल गियर नोबल दिले जाईल.

# अनधिकृत परदेशी सिगारेट व्यापाऱ्यांनवर मुलुंड पोलिसांची कारवाई

**मुंबई-** मुंबई मध्ये अनधिकृत पद्धतीने तस्करी करून आणण्यात आलेल्या परदेशी सिगारेटचा साठ्यावर मुलुंड पोलिसांनी केली. कारवाई ९मार्च २०१९ मुंबई चा मुलुंड पोलीस ठाणे येथे आलेल्या तक्रारीचा आधारावर पोलीस उप निरीक्षक हरीश भोये यांनी केलेल्या कार्यवाहीत २८१ परदेशी सिगारेटचे बॉक्स जप्त करण्यात आल्याने कोटप अधिनियमा अंतर्गत ७ (३) २०(२) कलमांतर्गत २ व्यक्तींवर दखलपात्र (FIR) गुन्हे नोंद करण्यात आली. आताच काही दिवसांपूर्वीच दक्षिण मुंबईमध्ये मुंबई पोलिसांनी कार्यवाही करून लाखों रुपयांचा परदेशी बनावटीच्या सिगारेटचा साठा तस्करांकडून छापा मारून जप्त केला. त्या व्यतिरीक्त ९ फेब्रुवारी २०९१९रोजी (डीआआई) ने सुद्धा नवी मुंबई येथे १७ करोड रुपयांची किंमत असलेल्या तस्करी करून आणलेल्या परदेशी बनावटीचा माल जप्त केला. जो आतापर्यंतचा सिगारेट तस्करी मधील सर्वात मोठी कारवाई मानली जात आहे. या परदेशी सिगारेटच्या पाकिटांवर कोणत्याही प्रकारची आरोग्य बाबत सूचित करणारे चिन्ह नसते, किंवा धोक्याची जाणीव करून देणारी सूचना नसते. त्यामुळे भारतीय कोर्ट अधिनियमानुसार हा एक दंडनीय अपराध मनाला जातो. त्या व्यतिरिक्त भारतात आशा सिगारेट वर ७२.२% आयात शुल्क आणि आईजीएसटी ड्युटी लावण्यात येते. त्याच्यामुळे आपल्याला नेहमी परदेशी सिगारेटचा तस्करीच्या घटना नेहमी घडत असतात.प्रत्येक वर्षी मुंबई पोलीस व



डी.आर.आई.विभाग चा अथक प्रयत्नातुन कार्यवाही करून शेकडो गुन्हे नोंद केले जात आहेत. तरीही अशा परदेशी सिगारेट तस्करी करणाऱ्या लोकांवर पुर्णतः अंकुश लावण्यात पोलिसांना यश आलेले नाही. यावर कडक उपाय योजनांच्या दृष्टीकोनातून कोर्ट अधिनियम २००३ मध्ये संशोधन करून अधिक कडक नियम कायदे आमलात आणण्याची गरज आहे.

# तालिबानच्या मदतीनं मसूदचा भारतात हल्ले करण्याचा प्लॅन

**दिल्ली-** जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या मसूद अजहर तालिबानच्या साथीनं भारतात घातपाती कारवाया करण्याच्या विचारात होता. याबाबत त्यानं डिसेंबर २०१८मध्ये तालिबान आणि हक्कानी नेटवर्क सोबत बोलणी देखील केल्याची माहिती न्यूज१८ला मिळाली आहे. भारताच्या गुप्तचर विभागाला याबाबतची माहिती मिळाली होती. दरम्यान, भारताविरोधात तालिबान्यांना उकसवण्याचा प्रयत्न देखील मसूद अजहरनं केला होता. भारतात आत्मघातकी कारवाया कशा करता येतील? याबाबत हक्कानी नेटवर्कचा कमांडर बिलाल जर्दान आणि गुल अब्दुल रहमान यांच्याशी मसूदनं संपर्क साधला होता. पण, सध्या तरी मसूद आयएसआयच्या सुरक्षेत पाकिस्तानात आहे.

जगात सध्या दहशतवाद वाढताना दिसत आहे. दरम्यान, पुलवामा येथे झालेल्या हल्ल्यानंतर भारतानं दहशतवादाविरोधात कठोर पावलं उचलायला सुरूवात केली आहे. शिवाय, भारतानं एअर स्ट्राईक करत दहशतवाद्यांच्या तळांना देखील उद्ध्वस्त केलं.

पाकिस्तानच्या जमिनीवर दहशतवादाला थारा नाही, अशी भाषा करणारा पाकिस्तानच दहशतवादाला पोसत असल्याचा ढळढळीत पुरावा समोर आला आहे. पाकिस्तनामध्ये



दहशतवाद्यांचे जवळपास २२ कॅम्प आहेत. यामधील ९ कॅम्प हे जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेचे असल्याची माहिती आता सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे भारतातील दहशतवादी कारवायांना पाकिस्तान पाठिंबा देत आहे हे स्पष्ट होतं.

पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये ४० जवान शहीद झाले. या हल्ल्याची जबाबदारी जैश ए मोहम्मदनं घेतली होती. त्यानंतर भारतानं देखील एअर स्ट्राईक करत २०० ते ३०० दहशतवाद्यांना ठार केलं होतं. दरम्यान, भारतानं केलेल्या कारवाईनंतर पाकिस्ताननं आम्ही दहशतवादाला पाठिशी घालत नाही.

# लंडनच्या रस्त्यावर बिनधास्त फिरतोय नीरव मोदी

**लंडन-** भारतीय बँकांना १३ हजार कोटींचा चुना लावून फरार झालेला हिरे व्यापारी नीरव मोदी सध्या लंडनच्या रस्त्यावर फिरताना दिसून आला आहे. भारतीय तपास यंत्रणा नीरव मोदीचा शोध घेत आहेत. असे असताना कोणत्याही भीतीचा लवलेश चेहऱ्यावर दिसत नसलेला नीरव मोदी लंडनच्या रस्त्यावर निवांत फिरत असल्याची बातमी एका वृत्तपत्राने दिली आहे. तसेच तो फिरत असलेला एक व्हिडिओही व्हायरल झाला आहे.

लंडनच्या रस्त्यावर फिरणाऱ्या नीरव मोदीला जेंव्हा एका इंग्रजी वृत्तपत्राच्या प्रतिनिधीने प्रश्न विचारले, तेंव्हा नीरवने एकाही प्रश्नाचे उत्तर दिले नाही. त्याने प्रत्येक प्रश्नाला नो कमेंट म्हणत बगल दिली. भारत सरकारच्या अंमलबजावणी



संचालनालयाने (ईडी) कडून नीरव मोदीला अटक करण्यासाठी अनेकवेळा लंडनमधील अधिकाऱ्यांना कळविले होते, मात्र लंडनच्या अधिकाऱ्यांकडून यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. ईडीकडून पीएनबी घोटाळ्यातील आरोपी नीरव मोदीच्या १४७.७२ कोटी रुपयांच्या संपत्तीवर टाच आणली आहे. तसेच ईडीकडून फेब्रुवारी २०१८ मध्ये नीरव मोदीच्या विरोधात मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आतापर्यंत नीरव मोदीची भारत आणि परदेशातील मिळून १,७२५.३६ कोटी रुपयांची संपत्ती जप्त करण्यात आली आहे. तसेच नीरव मोदी समुहाशी संबंधीत कोट्यवधी रूपयांचे सोने, हिरे, दागिने तसेच अन्य किंमती वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.

# मुंबईत १३ ते २७ मार्चदरम्यान सुरक्षेसाठी जमावबंदी आदेश लागू

**मुंबई-** सुरक्षा तसेच येणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत १३ ते २७ मार्चदरम्यान जमावबंदीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. या काळात आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे मुंबई पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तानमध्ये पसरलेल्या तणावाच्या वातावरणामुळे दहशतवादी हल्ल्याच्या शक्यतेतून देशाची आर्थिक राजधानी मुंबईसह महत्त्वाच्या ठिकाणी कडेकोट बंदोबस्त तैनात आहे. सुरक्षेच्या कारणास्तव मुंबईच्या पाचही प्रवेशद्वारांसह जागोजागी नाकाबंदी करून संशयित व्यक्ती, वस्तू आणि वाहनांची तपासणी करण्यात येत आहे। रस्ते, रेल्वे, मुंबई मेट्रो, समुद्र किनारपट्टी अशा ठिकाणी पोलिसांचा



पहारा आहे. या सुरक्षेबरोबरच येणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी १३ मार्च २७ मार्च या काळात जमावबंदी लागू केली आहे.

# काश्मीरी तरुणांवरील हल्ले खेदजनक, नरेंद्र मोदींनी हल्लेखोरांना झापले

**लखनौ-** काश्मीरी तरुणांना झालेल्या मारहाणीचा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. आज उत्तर प्रदेशमधील कानपूर येथील रॅलीदरम्यान मोदींनी नागरिकांना देशात एकतेचे वातावरण टिकवून ठेवण्याचे आवाहन केले आहे. मोदी म्हणाले की, 'लखनौमध्ये काही समाजकंटकांनी काश्मीरी तरुणांसोबत केलेले कृत्य निंदणीय आहे. उत्तर प्रदेश सरकारने त्याविरोधात कडक कारवाई केली आहे. त्यामुळे मला योगी सरकारचा अभिमान वाटतो. देशात असे प्रकार घडायला नको. यामुळे देशाच्या एकतेचे नुकसान होते' मोदींनी या रॅलीदरम्यान पुन्हा एकदा विरोधकांना लक्ष्य केले. मोदी म्हणाले की, 'विरोधक आमच्याकडे एअर स्ट्राईकचे पुरावे मागत आहेत. हे लोक भारतीय लष्कराच्या शौर्यावर अविश्वास दाखवत आहेत. विरोधक हल्ली जे काही बोलतात ते ऐकून आपले शत्रू खूश होतात.'मोदी म्हणाले की, 'पुलवामा हल्ल्यानंतर भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानची कोंडी करण्याचे खूप प्रयत्न केले आहेत.

पृष्ठ १ वरुन

# उद्योगश्री जीवनगौरव पुरस्काराने रोहिदास पाटील सन्मानित



दरम्यान प्रविण रब्बर कंपनीचे संचालक रोहिदास पाटील म्हणाले की, मी उद्योजक होण्याच्या मागे माझे संपूर्ण कुटुंब आहे. सव्वा रुपया रोजगाराने अशा परिस्थिती मी नोकरी केली. सन १९६९ मध्ये प्रविण रब्बर कंपनीत मीच कामगार, मीच मालक, मीच सेल्समन अशा पद्धतीत सुरु झालेल्या कंपनीचा माल आज देशातील मोठ्या उद्योग समूहामध्ये जात आहे. भाईंदर मधील मोठ्या दुर्घटनेनंतर सन १९९४ मध्ये २१ विद्यार्थ्यांवर सुरु झालेले महाविद्यालय आज ८५०० विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेत आहेत. दरम्यान पाटील यांनी राम कापसे, राम नाईक यांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.

प्रमुख पाहुणे सारस्वत बँक अध्यक्ष गौतम ठाकूर, सन्माननीय पाहुणे बाष्प इंडस्ट्रीज ठाणे बापू पाटील, कार्यक्रम अध्यक्ष कॅम्लिन - कोकियो लि. मुंबई मानद अध्यक्ष सुभाष दांडेकर, केसरी टूर चे संचालक केसरी पाटील, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर, नरेश राऊत, या सोहळ्याचे यजमान राजेश सोळंकी, हर्षल वालावलकर यांच्या उपस्थित झाला. यात नामवंत उद्योग समूहातील संचालकांना उद्योगश्री पुरस्काराने सन्मानित करण्यता आले. त्यात उद्योगश्री जीवनगौरव पुरस्कार रोहिदास पाटील यांना देण्यात आला. उद्योगश्री प्रकाशन द्वारा आयोजित आणि मिराज इन्स्टुमेटेशन सर्विसेस (इं.) प्रा. लि. ठाणे, व एच. आर. कॉपीरेशन मुंबई आयोजित द्वारा प्रायोजित रौप्यमहोत्सवी उद्योगश्री गौरव सन्मान सोहळा झाला.

पृष्ठ १ वरुन

# मिरा-भाईंदर परिसरात सोशल राईटस् फाऊंडेशनच्यावतीने महिला दिन मोठ्या थाटात संपन्न






त्याचप्रमाणे नियमित आहार कसा असावा यासाठी डॉ.प्रिया खेतान डायटीशन व महीलांना होणारा हाडांचा त्रास गुडगे दुखी,पाठ दुखणे यावर डॉ.निधी काबरा फिजीओथेरफी यांनी महीलांना मार्गदर्श न केलो.या कार्यक्रमात सोशल राईटस् फाऊडेशनचे संस्थापकश्री.दिपक मो. नाईक, श्री.डॉ. प्रविण छाजेड, श्री.अनिल मेहता, श्री.विनोद मेढे, श्री.प्रविण सुर्वे , श्री.संदिप लोहार उपस्थित होते.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)